**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य.**
निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण विभाग, मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११ ००१
दुरध्वनी क्र. ०२०-२६१२९४७९ ई-मेल-ddaseed@gmail.com

## मागदर्शक सुचना

### योजनेचे नाव- राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान प्रसार अभियानांतर्गत बियाणे व लागवड साहित्य उपअभियान रब्बी व उन्हाळी हंगाम २०१८-१९ मध्ये राबविण्याकरीता मार्गदर्शक सुचना

वाचा:-१. राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान अंतर्गत बियाणे (एनएमएईटी) च्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना
२. शासन निर्णय क्र. योजना ३३१८/प्र.क्र.१३५/१-अे, दि. ३१/०७/२०१८
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. १०-२/२०१८ एसडी-६, नवी दिल्ली, दि. १५/१०/२०१८
४. महाबीज, अकोला यांचे पत्र क्र. महाबीज/विपणन/२०१८/१०६२, दि. १७/१०/२०१८

---

**प्रस्तावना व योजनेचा उद्देश :**

उपरोक्त संदर्भिय केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना व राज्य शासनाच्या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने "फार्म सेव्हड सिड" वृध्दीगत करून शेतकरी स्तरावर बियाणे बदल दरात वाढ करण्याच्या उद्देशाने बियाणे व लागवड साहित्य उप अभियान (एसएमएसपी'अंतर्गत ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम (एसव्हीएस) हा घटक राबविण्यात येतो

राज्यात रब्बी २०१८-१९ मध्ये हरभरा व गहू या पिकाकरीता व उन्हाळी हंगाम २०१८-१९ मध्ये भुईमूग या पिकाचे महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला यांचे मार्फत ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. मा. आयुक्त कृषि यांचे निर्देशानुसार सदर योजना कोकण विभागातील जिल्हयांव्यतिरीक्त उर्वरीत २९ जिल्हयांमध्ये राबवावयाची आहे. ग्राम बिजोत्पादन कार्यक्रम (एसव्हीएस) हा घटक राबविण्याच्या मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

१. गावाची आणि लाभार्थी शेतक-यांची निवड जिल्हा स्तरावर कृषि विभागाचे संबंधित अधिकारी व जिल्हा व्यवस्थापक महाबीज यांनी संयुक्तपणे समन्वयाने करावयाची आहे. लाभार्थी शेतक-यांचा सात-बारा उतारा, आधारकार्ड व भ्रमणध्वनी क्रमांक यांचेसह शेतक-यांची यादी तयार करण्यात यावी.

२. निवड केलेल्या शेतक-यांचा तपशील खालील नमून्यात ठेवण्यात यावा.

| अ.क्र. | शेतक-याचे नाव | प्रवर्ग | गांव | तालुका | पिक व वाण | बिल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

| दिनांक | मात्रा | अनुदानाची रक्कम | शेतक-याकडून वसूल करावयाची रक्कम | आधार क्रमांक | मोबाईल क्र | प्रवर्ग | शेतक-याची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १६ |

३. सदर कार्यक्रमात सद्यस्थितीत विहीत भौतिक लक्षांक व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व सर्वसाधारण प्रवर्गाकरीता उपलब्ध असलेल्या निधीच्या मर्यादेत प्रवर्गनिहाय शेतक-यांची निवड यादी तयार करण्यात यावी. प्रवर्गनिहाय उपलब्ध असलेला निधी तपशील खालीलप्रमाणे आहे. (रक्कम रू.लाखात)

| प्रवर्ग | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | १२८८.८९ | ८५९.२६ | २१४८.१५ | ३२ टक्के |
| अनूसूचित जमाती | ६७०.३७ | ४४६.९१ | १११७.२८ | १७ टक्के |
| सर्वसाधारण | २०४०.६४ | १३६०.४४ | ३४०१.०७ | ५१ टक्के |
| **एकुण** | **३९९९.९०** | **२६६६.६१** | **६६६६.५०** | **१०० टक्के** |

४. प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या टक्केवारीनुसार निवड केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना एक एकर क्षेत्र मर्यादेत खालीलप्रमाणे अनुदानीत दराने स्त्रोत बियाणे पुरवठा करावयाचा आहे.

**हरभरा पिकाचे वाणनिहाय जाहिर केलेल्या विक्री किमतीमधून अनुदान रू. ३०००/- वजा करून अनुदानित दराने प्रमाणित बियाणे लाभार्थी शेतक-यांना वाटप करण्यात यावे.**

**गहू पिकाचे महाबीजने जाहिर केलेल्या दरामधून अनुदानाची रक्कम रू. १६००/- प्रति क्विं वजा करून अनुदानित दराने बियाणे लाभार्थी शेतक-यांना वाटप करण्यात यावे.**

रब्बी हंगाम २०१८ करीता महाबीजने गहू व हरभरा पिकाचे वाण निहाय दर (विक्री किंमत) वेगवेगळे जाहिर केलेले आहेत. महाबीजने जाहिर केलेले दर देय अनुदान व वितरणाअंतर्गत शेतक-यांकरीता अनुदानित दर (प्रति क्विं.) याचा तपशील खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पिक व वाण | पॅकींग साईज किलो | वितरणाकरीता दर प्रति क्विंटल रुपये | वितरणाकरीता अनुदान प्रति क्विंटल रुपये | वितरणाअंतर्गत शेतक-यांकरीता अनुदानीत दर प्रति क्विंटल रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | हरभरा | | | | |
| | दिग्वीजय, आकाश | १० | ७००० | ३००० | ४००० |
| | दिग्वीजय, आकाश | २० | ६८०० | ३००० | ३८०० |
| | जॅकी ९२१८ | १० | ७००० | ३००० | ४००० |
| | जॅकी ९२१८ | ३० | ६८०० | ३००० | ३८०० |
| | विजय | १० | ७००० | ३००० | ४००० |
| | विजय | २० | ६८०० | ३००० | ३८०० |
| | विशाल | १० | ७२०० | ३००० | ४२०० |
| | विशाल | २० | ७००० | ३००० | ४००० |
| | विराट | ५ | ९००० | ३००० | ६००० |
| २ | गहू | | | | |
| | एचडी-२१८९, राज- ४०३७, एनआयअेडब्ल्यु-३०१ | ४० | ३५०० | १६०० | १९०० |
| | लोक-१, जीडब्ल्यु-४९६ | ४० | ३४०० | १६०० | १८०० |
| | एचआय- १४१८ (चांदोसी) | २० | ४००० | १६०० | २४०० |
| | एनआयअेडब्ल्यु-९१७ | २० | ३५०० | १६०० | १९०० |
| | एचआय- ८६६३ (पोषण), एचआय-१५४४ (पुर्णा) | २० | ३६०० | १६०० | २००० |
| | फुले समाधान, एमअेसीएस-६४७८, युअेएस- ४२८, एमअेसीएस-६२२२, फुले नेत्रावती, अेकेअेडब्ल्यु- ४६२७ | २० | ३६०० | १६०० | २००० |
| | एचडब्ल्यु-१०९८ (खपली) | १० | ४५०० | १६०० | २९०० |

५. निवड केलेल्या लाभार्थी शेतक-यांना बियाणे खरेदी करण्याचे सोबतच्या नमून्याप्रमाणे परमीट दयावयाचे आहे. लाभार्थी निवड करताना शेतक-याचे आधारकार्ड प्राप्त करुन घेवून कमीत कमी एक एकर क्षेत्राकरीता

अथवा धारण केलेले क्षेत्र या पेक्षा जे कमी असेल ते इतक्या क्षेत्राकरीता लाभार्थी शेतक-यांना परमीट वाटप करण्यात यावे. बियाणे परमीटची छपाई करून परमीटचा पुरवठा महाबीज यांचेकडून कृषि खात्यास करण्यात येईल. महाबीजकडून परमीट प्राप्त करून घेऊन रब्बी हंगाम २०१८-१९ साठी पेरणीपुर्वी शेतक-यांना बियाणे परमिटचे वाटप करण्याची कार्यवाही त्वरीत करणेत यावी. परमीटचे वाटप महाबीजने आवश्यकतेनुसार त्यांचे अधिनस्त असलेले सहायक क्षेत्राधिकारी यांचे मार्फत कृषि विभागाच्या समन्वयाने परमीटचे वाटप करावे. परमीटचे वाटप प्रवर्गनिहाय शेतक-यांच्या निर्धारीत आर्थिक व भौतिक लक्षांकाच्या अधिन राहून करण्यात यावे.

६. महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक यांनी जिल्हयामध्ये उपलब्ध असलेले वाणाचेच व पात्र इतकेच परमीट देण्याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन लाभार्थी शेतकरी बियाणे मिळणेपासून वंचित राहणार नाही.

७. लाभार्थी शेतकरी परमीटनुसार अनुदान वगळता उर्वरीत बियाण्यांची रक्कम भरुन महाबीज च्या अधिकृत विक्रेत्यांकडून बियाणेची उचल करतील.

८. जिल्हा व्यवस्थापक, महाबीज हे याबाबत जिल्हास्तरावर महाबीजतर्फे संपर्क अधिकारी राहतील. जिल्हा व्यवस्थापक महाबीज यांनी लाभार्थी शेतक-यांची निवड केलेल्या गावालगतच्या महाबीजच्या अधिकृत विक्रेत्याकडे बियाणे पुरवठा करण्याचे नियोजन करावे. याबाबतच्या सर्व आवश्यक नोंदी जिल्हा व्यवस्थापक महाबीज यांनी ठेवावयाचे आहेत.

९. सदर योजनेअंतर्गत शेतक-याकरीता महाबीजमार्फत बिजोत्पादन कार्यक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, पिक फुलो-यावर असतांना प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात येईल. सदर प्रशिक्षणात पिकामधील भेसळ ओळखणे व काढणे, विलगीकरण अंतर, पिकाची काढणी व मळणी, बियाणे साठवणूक ईत्यादी बाबींचा अंर्तभाव करून तांत्रिक मार्गदर्शक करण्यात येईल. सदर प्रशिक्षण दिल्याबाबतचा तपशील महाबीजने आयुक्तालयास सादर करावा.

१०. सदर कार्यक्रमांतर्गत संवर्गनिहाय वाटप करण्यात आलेल्या शेतक-यांची माहिती केंद्र शासनाच्या सुचनेनुसार केंद्र शासनाच्या संकेतस्थळावर (Seednet.gov.in/DBT seed) महाबीजने भरुन घ्यावयाची आहे.

११. बियाणे वाटप पुर्ण होताच संवर्गनिहाय शेतक-यांच्या संगणकीकृत याद्या जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व जिल्हा व्यवस्थापक, महाबीज यांच्या संयुक्त स्वाक्षरीने महाबीजने वरीष्ठ कार्यालयास व आयुक्तालयास सादर कराव्यात.

महाबीज, अकोला यांचेकडून प्राप्त हरभरा व गहू पिकाचे जिल्हानिहाय लक्षांक सोबत देण्यात येत आहे.

**भुईमूग पिकाचे लक्षांक यथावकाश देण्यात येतील.**

**सोबत-** १. हरभरा व गहू पिकाचे जिल्हानिहाय लक्षांक

कृषि संचालक (नि. व गुनि),
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

-----o--o--o--o--o-----

जा.क्र.गुनि१/२/एसएमएसपी/मासु/४४/२०१८
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
दिनांकः१७/१०/२०१८

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक, सर्व
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सर्व (कोकण विभागातील जिल्हे वगळून)

माहितीस्तव प्रत

१. महाव्यवस्थापक (उत्पादन/वितरण), महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
२. कृषि उपसंचालक (मा. आयुक्त कृषि कक्ष), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. उमेश चांदिवडे, कक्ष अधिकारी, १-अे, कृषि व पदुम विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

रब्बी २०१८-१९ मध्ये राष्ट्रीय कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान अंतर्गत (एनएमअेईटी) बियाणे व लागवड साहित्य उप-अभियान (एसएमएसपी) मध्ये ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमाचे हरभरा व गहू पिकाचे जिल्हानिहाय स्त्रोत बियाणे वाटपाचे लक्षांक

दि. १७/१०/२०१८

(बियाणे क्विं. मध्ये)

| जिल्हा/विभाग | हरभरा | गहू | एकुण |
|---|---|---|---|
| नाशिक | ५२० | ४२०० | ४७२० |
| धुळे | ४४० | ३५०० | ३९४० |
| नंदूरबार | २४० | १५०० | १७४० |
| जळगांव | २४०० | ३३०० | ५७०० |
| एकुण | ३६०० | १२५०० | १६१०० |
| अहमदनगर | ३२८० | ९३०० | १२५८० |
| पुणे | २४० | २१०० | २३४० |
| सोलापूर | ४८० | ४३०० | ४७८० |
| एकुण | ४००० | १५७०० | १९७०० |
| सातारा | ३२० | ८०० | ११२० |
| सांगली | ४०० | ९०० | १३०० |
| कोल्हापूर | २४० | ३०० | ५४० |
| एकुण | ९६० | २००० | २९६० |
| औरंगाबाद | १२८० | ५००० | ६२८० |
| जालना | २८०० | ३९०० | ६७०० |
| बीड | ४७२० | ५१०० | ९८२० |
| एकुण | ८८०० | १४००० | २२८०० |
| लातूर | ८००० | १४०० | ९४०० |
| उस्मानाबाद | ७८४० | १४०० | ९२४० |
| नांदेड | १२६८० | १३०० | १३९८० |
| परभणी | २७२० | १५०० | ४२२० |
| हिंगोली | १०४० | १००० | २०४० |
| एकुण | ३२२८० | ६६०० | ३८८८० |
| बुलडाणा | ५३६० | २३०० | ७६६० |
| अकोला | ९६०० | ५५५० | १५१५० |
| वाशिम | ४८०० | ४३०० | ९१०० |
| अमरावती | ६९६० | २४०० | ९३६० |
| यवतमाळ | १४४०० | ४५०० | १८९०० |
| एकुण | ४११२० | १९०५० | ६०१७० |
| वर्धा | २४०० | १८०० | ४२०० |
| नागपुर | ४८०० | ६१०० | १०९०० |
| भंडारा | ५६० | ७०० | १२६० |
| गोंदिया | १२० | ३०० | ४२० |
| चंद्रपूर | १२०० | १००० | २२०० |
| गडचिरोली | १६० | २५० | ४१० |
| एकुण | ९२४० | १०१५० | १९३९० |
| एकुणात एकुण | १००००० | ८०००० | १८०००० |

कृषि संचालक (नि. व गुनि)

कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.